**कोरोना (कोविड-१९) संसर्गामुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना अर्थसहाय्य मिळणेबाबत नवीन योजना.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- अनाथ-२०२१/प्र.क्र.४९/का-०३**
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- जून, २०२१.

**प्रस्तावना :-**

सद्य:स्थितीत संपूर्ण देशामध्ये कोवीड-१९ या आजाराचे संक्रमण वाढलेले आहे. सदर आजाराच्या दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रात या आजाराचे संक्रमण झालेल्या रुग्णांच्या संख्येमध्ये लाक्षणिक वाढ होताना दिसून येत आहे.कोवीड-१९ चे मोठ्या प्रमाणात होणारे संक्रमण नियंत्रीत करता यावे यासाठी राज्य शासनाने दिनांक २२ एप्रिल, २०२१ पासून संपुर्ण लॉकडाऊन घोषित केले आहे. तथापि, कोवीड-१९ संक्रमणाच्या दुस-या टप्प्यात या आजारामुळे मृत्यू पावणाऱ्या नागरीकांच्या संख्येमध्ये वाढ झालेली आहे.तर अनेक ठिकाणी एकाच कुटूंबातील आई आणि वडील अशा दोन्ही पालकांचा या आजारामुळे मृत्यु पावल्याच्या घटना राज्यामध्ये निदर्शनास आलेल्या आहेत. एकाच कुटूंबातील दोन्ही पालकांचा (आई आणि वडील) मृत्यु झाल्यामुळे ० ते १८ वर्ष वयोगटातील बालके पुर्णत: अनाथ होत असून दोन्ही पालकांचा मृत्यु झाल्यामुळे अनाथ झालेल्या मुलांची गंभीर समस्या राज्यात निर्माण झालेली आहे.

२. राज्यात कोविड विषाणूच्या प्रादुर्भावामुळे अनाथ झालेल्या बालकांची कौटुंबिक व आर्थिक हानी झाली असून, त्यांचे भवितव्य अंधकारमय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या बालकांची भावनिक व वैयक्तिक हानी भरुन निघणे सर्वत: अशक्य आहे. तथापि, या बालकांचे शिक्षण व आर्थिकदृष्टया स्वावलंबी होईपर्यंतचे आयुष्य त्यांना सन्मानाने जगता यावे व याकामी आर्थिकदृष्टया पूरक ठरावी या हेतूने राज्य शासनाकडून नजीकच्या कालावधीसाठी तसेच भविष्यासाठी देखील आवश्यक सहाय्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. शासनाच्या या योगदानामुळे सदर बालकांचा आर्थिक व सामाजिक विकास होण्यास मदत होऊन त्याचा अप्रत्यक्षरित्या देशाच्या विकासास हातभार लागून त्यास चांगले नागरिक म्हणून उभे राहण्याची संधी उपलब्ध होऊन सदर बालके त्यांच्या भविष्याविषयी आश्वस्त होतील.

३. मा.सर्वोच्च न्यायालयांतर्गत गठीत बाल न्याय समितीच्या दिनांक ५.५.२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये, एकाच कुटूंबातील दोन्ही पालकांचा (आई आणि वडील) मृत्यु झाल्यामुळे अनाथ झालेल्या बालकांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देवून त्यांचे यथायोग्य संगोपन करणेसाठी उपाययोजना करणेसाठी जिल्हास्तरावर टास्क फोर्स गठीत करणेबाबत निदेश प्राप्त झाले होते. मा.सर्वोच्च न्यायालयाकडून प्राप्त निदेशाच्या अनुषंगाने, शासन निर्णय दिनांक ७.५.२०२१ अन्वये, जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय टास्क फोर्स (कृती दल) गठीत करण्यात आलेला आहे. सदर टास्क फोर्स मुख्यत: जिल्ह्यात कोवीड-१९ मुळे अनाथ झालेल्या बालकांबाबतची माहिती संकलीत करणे, बालकांना सर्वोतोपरी संरक्षण उपलब्ध करून देणे व अशी बालके बाल कामगार, अनैतिक मानवी वाहतूक, मानवी तस्करी यास बळी पडणार नाहीत याची काळजी घेणे, बालकांचे आर्थिक व मालमत्ता विषयक हक्क अबाधित राहतील याची दक्षता घेणे, आवश्यकतेनुसार बाल संगोपन योजनेचा लाभ मिळवून देणे किंवा बालगृहात दाखल करणे इत्यादी विविध जबाबदाऱ्या पार पाडणार आहेत.

४. कोविड-१९ मुळे अनाथ झालेल्या बालकांच्या संगोपनासाठी विविध उपाययोजना करण्यात येत असल्या तरी कौटुंबिक वातावरणात राहिलेल्या व कोवीड मुळे अनाथ झालेल्या बालकांना सरसकट बालगृहांमध्ये दाखल

करण्याऐवजी अशा अनाथ बालकांना कौटुंबिक वातावरण उपलब्ध व्हावे व त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करण्याची आवश्यकता आहे.

५. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, ज्या बालकांनी आपले पालक गमावलेले आहेत, अशा बालकांना फायदा होऊन त्यांचे शिक्षण तसेच अर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होणार आहे. सबब, महाराष्ट्र राज्यामध्ये सुध्दा कोरोना (कोविड-१९) संसर्गामुळे अनाथ झालेल्या ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासनाच्या “PM CARES For Children- Empowerment of COVID Affected Children” ह्या योजनेव्यतिरिक्त राज्य शासनाकडून कोरोना (कोविड-१९) संसर्गामुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजनेंतर्गत कोविड-१९ संसंर्गामुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना अर्थसहाय्य उपलब्ध करणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही निश्चित करण्यात येत आहे. :-

**१) योजनेचा उद्देश :-**

महाराष्ट्र राज्यामध्ये कोरोना (कोविड-१९) संसर्ग किंवा इतर कारणामुळे दोन्ही पालकांचा मृत्यू झाल्यामुळे अनाथ झालेल्या ० ते १८ वर्ष वयोगटातील बालकांचे पुनर्वसन करणे व त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सहाय्य करणे.

**२) योजनेचे लाभार्थी :-**

१. दिनांक ०१ मार्च, २०२० रोजी किंवा त्यानंतर कोरोना (कोविड-१९) संसर्गामुळे ज्या बालकाचे दोन्ही पालक(आई आणि वडील) मृत्यू पावलेले आहेत अशी ० ते १८ वयोगटातील बालके.

२. दिनांक १ मार्च,२०२० रोजी किंवा त्यानंतर एका पालकाचा(आई किंवा वडील) कोवीड-१९ मुळे तर एका पालकांचा इतर कारणामुळे मृत्यु झाला असल्यास त्यांची ० ते १८ वर्षाआतील बालके.

३. दिनांक १ मार्च,२०२० पुर्वीच एका पालकाचा(आई किंवा वडील) मृत्यु झाला असेल व दिनांक १ मार्च,२०२० किंवा त्यानंतर एका पालकाचा कोवीडमुळे मृत्यु झाला असल्यास त्यांची ० ते १८ वर्षाआतील बालके.

**३) लाभाचे स्वरुप :-**

१. जी बालके कोविड-१९ संसर्गामुळे अनाथ झाली आहेत, अशा बालकांचे संगोपन करणेसाठी कुटूंबातील कोणताही सदस्य/ नातेवाईक इच्छूक नसल्यास त्या बालकाला काळजी व संरक्षणाची गरज आहे ही बाब विचारात घेवून त्यास विहित कार्यपध्दतीन्वये बालगृहामध्ये दाखल करण्यात येईल. याव्यतिरिक्त सदर बालकाच्या नावे एकरकमी ₹५.०० लक्ष (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त) इतकी रक्कम मुदत ठेव (फीक्स्ड डिपॉझीट) म्हणून जमा करण्यात येईल.

२. जी बालके कोविड-१९ संसर्गामुळे अनाथ झाली आहेत, अशा बालकांचे संगोपन करणेसाठी त्याचे नातेवाईक इच्छुक असतील तर अशा बालकांना महिला व बाल विकास विभागांतर्गत शासन निर्णय दि.६.४.२०२१ अन्वये राबविण्यात येणाऱ्या बालसंगोपन योजना अनुज्ञेय राहील. याव्यतिरिक्त सदर बालकाच्या नावे एकरकमी ₹५.०० लक्ष (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त) इतकी रक्कम मुदत ठेव (फीक्स डिपॉझीट) म्हणून जमा करण्यात येईल.

३. सदर योजनेंतर्गत एकरकमी मुदतठेवीची रक्कम संबंधित बालक व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या नावे असणाऱ्या सामायिक बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

**४) योजनेच्या अटी व शर्ती :-**

१. पात्र लाभार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

२. आई- वडील मृत्यू पावल्याचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र (मृत्यूचा दाखला)

३. पात्र लाभार्थ्याचा जन्म नोंदणीचा दाखला.

४. लाभार्थी शाळेत जात असल्यास टि. सी. / बोनाफाईड प्रमाणपत्र.

५. बालकांच्या नावे एकरकमी मुदत ठेव म्हणून जमा करण्यात आलेली ₹५.०० लक्ष रक्कम बालकाचे वय २१ वर्षे झाल्यानंतरच आहरित करण्यात येईल.

६. बाल संगोपन योजनेंतर्गत प्राप्त अर्थसहाय्याची रक्कम बालक तसेच त्याचे सध्याचे पालक (नातेवाईक) हे लाभार्थ्याच्या शैक्षणिक, वैद्यकीय अशा विविध गरजांसाठी या रक्कमेचा वापर करू शकतील.

७. मुतद ठेवीत गुंतविण्यात आलेल्या मुळ मुद्दल रक्कम व त्यावरील २१ व्या वर्षी देय असणारे व्याज अनुज्ञेय होण्यासाठी मुलगी वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत तर मुलगा असल्यास वयाची २१ वर्षे पूर्ण हाईपर्यंत अविवाहीत असणे आवश्यक राहील.

८. विहीत मुदतीपूर्वी मुलीचा किंवा मुलाचा विवाह झाल्यास अथवा नैसर्गिक किंवा इतर कोणत्याही कारणाने लाभार्थ्याचा मृत्यू झाल्यास सदर रक्कम शासनाच्या एकत्रित निधीत जमा करण्यात येईल.

९. संस्थाबाह्य लाभार्थ्याच्या नावे मुदत ठेव (फीक्स्ड डिपॉझीट) म्हणून रक्कम जमा करण्यात आल्यानंतर बँकेकडून देण्यात आलेल्या मुळ गुंतवणूक प्रमाणपत्राची प्रत लाभार्थी व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे राहील. तर संस्थेमध्ये दाखल लाभार्थ्याच्या गुंतवणूक प्रमाणपत्राची प्रत संबंधित संस्थेचे अधिक्षक व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे राहील.

**५) अर्ज करणे व प्रस्ताव मान्यतेची कार्यपध्दती :-**

१. महिला व बाल विकास विभागाच्या दि.७.५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठित कृतीदलामार्फत १ मार्च, २०२० किंवा त्यानंतर कोवीड संसर्गामुळे अनाथ झालेल्या बालकांचा शोध घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

२. सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या व कोविड संसर्गामुळे अनाथ झालेल्या बालकांची कागदपत्रे कृतीदलासमोर सादर करुन अनाथ बालकांना लाभ मिळवून देण्याची जबाबदारी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांची राहील.

३. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी सर्व कागदपत्रे योग्य असल्याची व बालकाच्या दोन्ही पालकांचा मृत्यू झालेला आहे याबाबत खातरजमा करून अर्थसहाय्य मान्यतेचा प्रस्ताव शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, दिनांक ७.५.२०२१ अन्वये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत टास्क फोर्स समोर सादर करण्यात यावा.

४. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत समितीने प्रस्ताव मान्य केल्यानंतर सदर रक्कम संबंधित बालक व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या नावे असणाऱ्या सामायिक बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

५. सदर पात्र बालकांसाठी बालसंगोपन योजनेंतर्गत देय असणारी रक्कम त्या बालकासाठी खर्च न करता इतर प्रयोजनासाठी त्याच्या पालक/ नातेवाईकाकडून खर्च केली जात असल्याचे व त्या बालकाकडे दुर्लक्ष केले जात असल्याची बाब निदर्शनास आल्यास त्या बालकाला काळजी व संरक्षण मिळावे यासाठी बालगृह/ शिशुगृहात दाखल करण्यात येईल.

६. प्रस्ताव मान्यतेसाठी समितीची वेळोवेळी बैठक आयोजित करण्याची जबाबदारी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांची राहील.
७. सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थी बालकांपैकी ज्या बालकांचा ताबा त्यांचे पालक किंवा नातेवाईकांकडे असेल अशा बालकांचे योग्य रितीने संगोपन होत असल्याची खातरजमा दरमहा करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांची राहील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( र.सि.जरांडे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/ सदस्य, विधानसभा/ विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. मा.मंत्री, नियोजन/ वित्त विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मंत्री/ राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
९. सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई
११. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
१३. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१६. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१८. उपायुक्त (महिला विकास)/ (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे
१९. सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालयामार्फत)
२०. सर्व जिल्हा महिला व व बाल विकास अधिकारी (आयुक्तालयामार्फत)
२१. सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. निवड नस्ती, का-०३.